**कृपया प्रसिद्धीसाठी** **16 सप्टेंबर 2011**

## चार महिन्यात पेट्रोलची 14 टक्के दरवाढ
## म्हणजे क्रूरपणाचा कळस : राम नाईक

**मुंबई,शुक्रवार:** ''दसरा-दिवाळीच्या तोंडावर पुन्हा एकदा पेट्रोलची दरवाढ करुन जनतेच्या आनंदात मीठाचा खडा टाकण्याचे काम काँग्रेस सरकारने केले आहे. पेट्रोलचे दर मे महिन्यात रु. 63.08 वरुन पाच रुपयांनी तर आता 3.40 रुपयांनी म्हणजेच अवघ्या चार महिन्यात 14 टक्के वाढवून आता रु. 71.92 करुन पेट्रोलियम मंत्र्यांनी क्रूरपणाचा विक्रमच केला आहे'', अशा तीव्र शब्दात माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी काल झालेल्या पेट्रोल दरवाढीचा निषेध केला.

''ही दरवाढ कोणत्याही प्रकारे समर्थनीय होऊ शकत नाही. अर्थतज्ञ पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या सरकारचे अर्थ शास्त्र अजब आहे. एकाबाजूला सामान्यांना लागणा-या पेट्रोल, डिझेल, रॉकेल व गॅसच्या किंमतींमध्ये अवाजवी वाढ, तर दुस-या बाजूला श्रीमंतांच्या विमान प्रवासाला लागणारे एटीएफ इंधन मात्र पेट्रोलपेक्षा थोडे-थोडके नव्हे तर प्रति लिटर रु. 58.45 म्हणजेच रु. 13.50 ने स्वस्त असे हे अजब अर्थशास्त्र आहे. दरवाढीने कंबरडे मोडलेली जनता महागाईच्या दुष्टचक्रात भरडली जाते आहे. गेल्या एका वर्षात 11 वेळा व्याजदर वाढवून सरकार महागाईच्या आगीत तेल ओतत आहे'', अशी टीका करुन श्री. राम नाईक यांनी ही दरवाढ मागे घेण्याची मागणी केली.

''आता तर सरकारने घरगुती गॅसच्या वाटपावर निर्बंध घालून तोही महाग करण्याचा डाव रचला आहे. गरीबांनीच नव्हे तर त्यांच्या जोडीला आता मध्यमवर्गानेही दिवाळी साजरी करु नये अशी या काँग्रेस सरकारची इच्छा दिसते'', असे मत व्यक्त करुन श्री. राम नाईक यांनी सरकारने नवे निर्बंध आणल्यास आधीच कृत्रिम तुटवडा असलेल्या घरगुती गॅसच्या काळाबाजाराला ऊत येईल असा स्पष्ट ईशारा दिला आहे.

**(कार्यालय सचिव)**